पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -१०   दिनांक - ०३/०१/२०२४**

गुन्हे शाखा,युनिट ६ पुणे शहर

## स्वतःच्या मुलीची निघृण हत्या करणा-या नराधम बापास अवघ्या ०३ तासात केले जेरबंद!

दि.०३/०१/२०२४ रोजी लोणीकंद पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये वाघोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पाठीमागे इसम नामे फकीरा गुंडा दुपारगुडे यांने त्याचीच १० वी मध्ये शिकत असणारी मुलगी अक्षदा दुपारगुडे हिचा स्वताःचे राहते घरात धारदार शस्त्राने सपासप वार करुन निर्घुण खुन करुन आरोपी पळुन गेला. सदरबाबत लोणीकंद पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर ०८/२०२४ भा.दं.वि.कलम ३०२ आर्म ॲक्ट ४(२७) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास युनिट-६ कडील अधिकारी व अमंलदार करत असताना आरोपी नामे फकीरा गुंडा दुपारगुडे हा गाडीतळ,हडपसर पुणे येथे थांबलेला आहे अशी खात्रीशीर माहिती बातमीदारा मार्फत मिळाली. सदर बातमीची खातरजमा करण्यासाठी वरिष्ठांचे सूचनेप्रमाणे तात्काळ युनिट-६ कडील अधिकारी व अंमलदार असे हडपसर भागात पुणे सोलापुर रोडवर जावुन बातमीतील वर्णनाच्या इसमासाचा शोध घेत असताना गाडीतळ परिसरात एक इसम संशयितरित्या हालचाली करीत असताना घाई-गडबडीत सोलापुरकडे बसमधुन जाण्याच्या तयारीत दिसला. सदर इसमास ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता तो पळुन जाऊ लागला असता त्यास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी पाठलाग करुन शिताफिने ताब्यात घेऊन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **फकीरा गुंडा दुपारगुडे वय-४५ वर्षे रा.वाघोली सरकारी हॉस्पीटल जवळ,संदीप सातव यांचे खोलीत नगर रोड जवळ वाघोली पुणे** असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे गुन्हयाबाबत विचारपुस केली असता घरामध्ये त्याची व त्याची पत्नी व मुलगा तसेच मयत मुलगी यांचेत मी काहीही काम करत नाही व काहीही पैसे कमवत नाही दारु पितो यावरुन वाद-विवाद होत होते. त्यामुळे सततच्या भांडणाला कंटाळुन मी आज दि.०३/०१/२०२४ रोजी सकाळी माझा मुलगा व पत्नी घरात नसताना माझी मुलगी अक्षदा हीचे सोबत दारु पिणेचे कारणावरुन वाद झाल्यामुळे घरात असलेल्या उस तोडण्याच्या धारदार कोयत्याने सपासप वार करुन तिला जिवे ठार मारल्याचे सांगितल्याने त्यास लागलिच ताब्यात घेवुन गुन्हयाचे पुढील कार्यवाही कामी लोणीकंद पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा, पुणे (मा.पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार)श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.अमोल झेंडे,मा.सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे २,श्री. सतिश गोवेकर,यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-६ चे पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम, पोलीस उपनिरीक्षक भैरवनाथ शेळके, पोलीस अंमलदार विठ्ठल खेडकर, बाळासाहेब सकटे, नितीन मुंडे, प्रतिक लाहीगुडे, सचिन पवार, ऋषिकेश व्यवहारे, नितीन धाडगे व ज्योती काळे यांनी केली.


उल्हास कदम
महाराष्ट्र पोलीस